दैनिक
# लोकांकीत
सत्याच्या बरोबर बातमीच्या पुढे जाणारे वृत्तपत्र
मुख्य संपादक-संजय पवार

## आरोपी माणसाच्या रुपातील राक्षस

**मुंबई**-पुणे जिल्ह्यातील नसरापूर येथे ४ वर्षांच्या चिमुरडीवर झालेल्या पाशवी अत्याचार आणि हत्येच्या घटनेने संपूर्ण राज्य हादरले आहे. या घटनेचे संतप्त पडसाद उमटत असतानाच, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पत्नी अमृता फडणवीस यांनी यावर अत्यंत तीव्र शब्दांत आपली प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. लहान मुलांवर अत्याचार करणाऱ्यांना रस्त्यावर सार्वजनिकरीत्या शिक्षा दिली पाहिजे, असे खळबळजनक पण रोखठोक मत त्यांनी व्यक्त केले आहे.१ मे रोजी राजगड पोलिस ठाण्याच्या हद्दीत ही मन सुन्न करणारी घटना घडली होती. एका ६५ वर्षीय नराधमाने ४ वर्षांच्या चिमुरडीवर अत्याचार करून दगडाने ठेचून तिची निर्घृण हत्या केली.

• (महाराष्ट्र) • वर्ष ९ वे • RNI : MAHMAR/2017/7448 • मंगळवार दि.१२ मे २०२६ • अंक-१०८ • दैनिक • पाने ४ • पान १ • किंमत २ रु.

# मोदींच्या काळात कामगारांची अवस्था बिकट:सरकारला कामगारांची मेहनत नव्हे फक्त उद्योगपती मित्रांचे फायदे दिसतात-विजय वडेट्टीवार



**मुंबई (वृत्तसंस्था)**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या काळात कामगारांची अवस्था बिकट झाली आहे. सध्या देशातील जवळपास २५ टक्के कामगारांना किमान वेतनही मिळत नाही. देश चालवणाऱ्यांना कामगारांची मेहनत दिसत नाही, फक्त उद्योगपती मित्रांचे फायदे दिसतात, अशी टीका काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी सोमवारी केंद्र सरकारवर निशाणा साधताना केली.एसबीआयचा पीएलएफएस २०२५ अहवाल नुकताच जारी झाला. विजय वडेट्टीवार यांनी या अहवालाचा दाखला देत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील केंद्र सरकारवर उपरोक्त शब्दांत निशाणा साधला. ते म्हणाले, सबका साथ, सबका विकास म्हणणाऱ्या मोदी सरकारच्या काळात कामगारांची अवस्था दिवसेंदिवस बिकट होत चालली आहे. स्टेट बँक ऑफ इंडिया च्या झङञ्ङ २०२५ अहवालानुसार देशातील जवळपास २५% कंत्राटी कामगारांना किमान वेतनही मिळत नाही. महिलांची अवस्था तर आणखी वाईट आहे. देश चालवणाऱ्यांना मात्र कामगारांची मेहनत दिसत नाहीत, फक्त उद्योगपती मित्रांचे फायदे दिसतात. नवीन Labour Codes च्या नावाखाली भाजप सरकारने कामगारांचे हक्कच कमजोर केले आहेत. संप करायचा असेल तर ६० दिवस आधी नोटीस द्या, तक्रार प्रलंबित असेल तर संप बेकायदेशीर ठरेल, सुरक्षा नियम मोडले तरी पैसे भरून सुटका मिळेल. म्हणजे कामगारांनी फक्त काम करत राहायचं, प्रश्न विचारायचे नाहीत, हक्क मागायचे नाहीत. Ease of Doing Businessच्या नावाखाली Hardship of Living सामान्य जनतेच्या माथी मारलं जात आहे.

भाजपची अर्थनीती आता स्पष्ट दिसते आहे. गरीबांची मेहनत स्वस्त करा, कामगारांचा आवाज दाबा आणि उद्योगपती मित्रांसाठी रेड कार्पेट अंथरा. पण लक्षात ठेवा, मजुरांच्या हाडांवर उभे केलेले महाल जास्त काळ टिकत नाहीत, असे ते म्हणाले.विजय वडेट्टीवार यांनी यावेळी पंतप्रधानांनी जनतेला केलेल्या काटकसरीच्या आवाहनाचाही खरपूस समाचार घेतला. तसेच २००८ च्या भयंकर जागतिक महामंदीचा काँग्रेसच्या कुशल नेतृत्वामुळे देशाला कोणताही फटका बसला नसल्याचाही दावा केला. ते म्हणाले, २००८ च्या महाभयंकर जागतिक मंदीतही ज्या देशाचं सुकाणू हललं नाही, मंदीचे चटके बसत असतानाही आपला देश सुरक्षित राहिला. तिथे आज महासत्तेच्या नावाखाली जनतेलाच त्याग करायला सांगितलं जातंय! २०१४ मध्ये अच्छे दिनचे स्वप्न दाखवून सत्तेत आलेले आज सांगतात पेट्रोल, डिझेल वापरू नका, सोनं घेऊ नका, खाद्यतेल कमी करा!साहेब, देशाला बर्बाद करायचं कार्यक्रम तुम्ही करायचा आणि जबाबदारी मात्र जनतेने घ्यायची? पाच राज्याच्या निवडणुका होईपर्यंत युद्धाचा विसर पडला होता, आता निवडणुका संपल्या की लगेच 'त्याग' आठवला? सल्ले द्यायला फक्त पंतप्रधान, आणि भोगायला मात्र सामान्य जनता! वाह मोदीजी वाह, असे ते म्हणालेत.

# एमडी ड्रग तयार करण्यासाठीची रसायने व लॅबचे साहीत्य गुन्हे प्रकटीकरण शाखेकडून जप्त.



**संतोष पडवळ । ठाणे**

दिनांक ०४/०४/२०२६ रोजी दुपारी ३ वाजता रुम नंबर २०२ छेडा आदर्श बिल्डींग, बैंक रोड, नयानगर, मिरारोड पुर्व जि. ठाणे येथे महिला नामे श्रीमती. फिरदोस अरबाज कुरेशी हिचे घरातुन एकुण १ किलो ३२४ ग्रॅम वजनाचा एकुण २,६६,१७,२८० रुपये किंमतीचा एम.डी हा अंमली पदार्थ जप्त करण्यात आला असुन सदरचा अंमली पदार्थ हा तिचा पती नामे अरबाज वकील कुरेशी याचा असल्याने आरोपीत नामे-श्रीमती. फिरदोस अरबाज कुरेशी व आरोपीत नामे अरबाज वकील कुरेशी यांचे विरुध्द नयानगर पोलीस ठाणे गुन्हा रजि नंबर १०२/२०२६ गुंगीकारक औषधीद्रव्ये आणि मनोव्यापारावर परीणाम करणारे पदार्थ अधि. १९८५ चे कलम ८ (क), २१ (क), २२ (क), २९, प्रमाणे दिनांक ०४/०४/२०२६ रोजी गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

सदर गुन्हयाचा सखोल तपास करण्यासाठी गुन्हे प्रकटीकरण शाखा कक्ष ४, कडे वर्ग करण्यात आला असता सदर गुन्हयात अद्याप पावेतो ०२ महिला आरोपी व ११ पुरुष आरोपी यांना अटक करण्यात आलेली आहे. सदर गुन्हयात एकुण ६ किलो ७७३ ग्रॅम वजनाचा एम.डी. ड्रग जप्त करण्यात आले असुन गुन्हयातील अटक आरोपी क्रमांक १२ व १३ यांचेकडुन एम.डी. ड्रग तयार करण्यासाठी लागणारे २५५ लिटर रसायन त्यात Sodium Hydroxide Pellets, Hydrochloric Acid, Acetone, Dichloromethane, Methylamine, Chloroform, व हिटींग ड्रायर, सेप्रेशन फ्लास्क, हिटींग मॅन्टल रिकव्हरी फ्लास्क, फोर फिंगर क्लॅम्प, ॲडीशन पॉट, बुकनर फनेल इत्यादी सामग्री सामना नगर मागील लग्न मैदान व आजमी नगर, मालवणी, मुंबई तसेच मौजे मनोरी, गोराई मुंबई. येथे जप्त करण्यात आला असुन अद्याप पावेतो एकुण १३.६५.४५,०९५/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. सदर गुन्हयाचा अधिक तपास गुन्हे प्रकटीकरण शाखा कक्ष -४ मार्फतीने सुरु आहे

# मान्सूनपूर्व तयारीचा ठाणे जिल्हाधिकाऱ्यांनी घेतला सविस्तर आढावा

**संतोष पडवळ । ठाणे**

आगामी पावसाळ्यात जिल्ह्यात कोणतीही दुर्घटना होऊ नये, यासाठी सर्व शासकीय यंत्रणांनी आतापासूनच सतर्क राहून समन्वयाने पूर्वतयारी करावी. जिल्ह्याचा आपत्ती व्यवस्थापन आराखडा चोख असावा आणि आपत्कालीन स्थितीत तत्काळ मदतीसाठी 'आपदा मित्रां'ची संख्या वाढवावी, असे निर्देश ठाण्याचे जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष डॉ.श्रीकृष्ण पांचाळ यांनी दिले आहेत.

जिल्हाधिकारी कार्यालय आणि जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'मान्सूनपूर्व तयारी आढावा बैठक २०२६' समिती सभागृहात संपन्न झाली, त्याप्रसंगी ते बोलत होते.या बैठकीस जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रणजीत यादव, अपर जिल्हाधिकारी हरिश्चंद्र पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. संदीप माने, उपजिल्हाधिकारी सर्जेराव मस्के-पाटील, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी डॉ. अनिता जवंजाळ यांच्यासह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.यावेळी बोलताना ते म्हणाले की, सार्वजनिक बांधकाम विभागाने पावसाळ्यापूर्वी जिल्ह्यातील सर्व धोकादायक पूल, साकव आणि जुन्या इमारतींचे ऑडिट करावे. जलसंपदा विभागाने धरणांची प्रत्यक्ष पाहणी करून तांत्रिक अहवाल सादर करावा. राष्ट्रीय महामार्ग आणि सार्वजनिक बांधकाम विभागाने मान्सून काळात दरडी कोसळण्याच्या घटना लक्षात घेऊन प्रमुख घाटांमध्ये जेसीबी, पोकलेन आणि डंपरची कायमस्वरूपी व्यवस्था करावी.

डॉ.पांचाळ यांनी आपत्कालीन परिस्थितीत यंत्रणांची गतिशीलता तपासण्यासाठी अग्निशमन दल, पोलीस आणि आरोग्य विभागाने प्रत्येक तालुक्यात रंगीत तालीम घ्यावी. पावसाळ्यात उद्भवणाऱ्या साथीच्या रोगांचा प्रसार रोखण्यासाठी आरोग्य विभागाने औषध साठा आणि वैद्यकीय पथके सज्ज ठेवावीत अशा सूचना देवून आपत्ती निवारणासाठी आवश्यक साधनसामुग्रीसाठी जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून अनुदान उपलब्ध करून दिले जाईल,असे स्पष्ट केले.




# अस्वच्छ खासगी धाब्यांवर एसटी बस थांबत असल्याने प्रवाशांत संताप;कारवाईची मागणी

**संगमेश्वर । सत्यवान विचारे.**

मुंबईहून ये-जा करणाऱ्या राज्य परिवहन (एसटी) महामंडळाच्या बसगाड्या खासगी धाब्यांवर थांबत असल्यामुळे प्रवाशांना आवश्यक सुविधा मिळत नसल्याच्या तक्रारी वाढू लागल्या आहेत. यामुळे प्रवासी वर्गातून तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.

विशेषतः या धाब्यांवरील शौचालये आणि मुताऱ्या अत्यंत अस्वच्छ अवस्थेत असून, परिसरात घाणीचे साम्राज्य असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. स्वच्छतेचा पूर्ण अभाव असल्यामुळे प्रवाशांना मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागत आहे. प्रवाशांना बैठक व्यवस्था अथवा उभे राहण्यासाठी कोणतीच सोय नसल्याने वाहक चालक येई पर्यंत उन्हात ताटळत उभे राहावे लागत आहे.काही ठिकाणी एक-दोनच मुताऱ्या उपलब्ध असून त्या देखील वापरण्यायोग्य नसल्याची स्थिती आहे. महिलांसाठी स्वतंत्र शौचालय असले तरी तेथे स्वच्छ सुविधा नसल्याने





त्यांची अधिक गैरसोय होत असल्याची तक्रार आहे.

प्रवाशांकडून वारंवार तक्रारी करूनही संबंधित प्रशासन किंवा एसटी महामंडळाकडून कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याने संताप व्यक्त केला जात आहे. बस थांबणाऱ्या ठिकाणी बैठक व्यवस्था नसल्यामुळे अनेक प्रवाशांना उन्हात उभे राहावे लागत आहे.

याठिकाणी मिळणाऱ्या नाश्ता व जेवणाच्या पदार्थांचा दर्जाही समाधानकारक नसल्याचे प्रवाशांचे म्हणणे आहे. त्यातच पदार्थांचे दरही जास्त असल्याने प्रवाशांच्या खिशाला अतिरिक्त भुर्दंड सहन करावा लागत आहे.

दरम्यान, चालक व वाहक यांना मोफत सुविधा मिळत असल्याने प्रवाशांच्या गैरसोयीकडे दुर्लक्ष होत असल्याची चर्चा प्रवासी वर्गात सुरू आहे. मुंबईहून येताना कशेडी बोगद्याजवळील एका खासगी धाब्यावर चिपळूण, गुहागर, देवरुख आणि खेड डेपोच्या बसगाड्या थांबत असल्याचा आरोप प्रवाशांकडून करण्यात येत आहे.अशा अस्वच्छ धाब्यांवर बस थांबविण्याऐवजी अधिकृत, स्वच्छ व दर्जेदार सुविधा असलेल्या ठिकाणीच थांबे देण्यात यावेत, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे. प्रवाशांच्या आरोग्य आणि सुविधांचा विचार करून संबंधित प्रशासनाने तातडीने उपाययोजना करावी, अन्यथा आंदोलन छेडण्याचा इशारा प्रवासी वर्गातून देण्यात आला आहे.

# परशुराम एज्युकेशन सोसायटी चिपळूण संचालित गुरुकुल विभागाचे शत प्रतिशत यश!

**संगमेश्वर । प्रतिनिधी**

गेल्या शंभर वर्षांहून जास्त कालावधी चिपळूण मध्ये ज्ञान दानाचे पवित्र कार्य करत असलेल्या परशुराम एज्युकेशन सोसायटी संचालित युनायटेड इंग्लिश स्कूल चिपळूणचा २०१९ सुरुवात झालेला एक अभिनव आणि वेगळा शैक्षणिक प्रयोग म्हणजे पंचकोशाधारीत गुरुकुल विभाग! गेली सहा वर्षे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्व घडणीसाठी अनेक विशेष आणि वेगळे उपक्रम आयोजित करणाऱ्या गुरुकुल विभागातील इयत्ता दहावीची यावर्षी दुसरी तुकडी माध्यमिक शालांत परीक्षेसाठी शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये प्रविष्ठ झाली.

नियमित अकरा तास गुरुकुल मध्ये उपस्थित राहून परीक्षेसाठीचा पाठ्यक्रमाचा अभ्यास करता करता त्या अभ्यासाशीच जोडलेल्या विविध उपक्रम, प्रकल्प, अभ्यास कौशल्य, स्वयंअध्ययन कौशल्य, अभ्यास पूरक शिबिरे, विषय निहाय जास्तीचे मार्गदर्शन, सकाळ अभ्यासिका आणि सराव परीक्षा अशा चाकोरी बाहेरील मार्गांचा अवलंब करत २४ विद्यार्थी गुरुकुल मधून दहावीच्या परीक्षेसाठी प्रविष्ठ झाले होते.

गुरुकुल विभागातील एकूण सात विद्यार्थ्यांनी ९०% पेक्षा जास्त गुण मिळवून गुरुकुलाची मान उंचावली.

यापैकी रुद्र धन्वंतर वळंजू( ९७.२०)याने प्रथम क्रमांक तर शर्वरी विजय सावंत (९६.२०) हिने द्वितीय क्रमांक आणि गंधार सुशांत नाईक (९५.२० )याने तृतीय क्रमांक प्राप्त केला. या विद्यार्थ्यां सोबतच कु.ईश्वरी ओमप्रकाश राजे (९५.००), अथर्व नागराज वळंजू (९३.४०) , श्रीश मिलिंद तांबे (९३.२०), अवधूत दत्ताराम लाड (९२.८०) यांनी ९०% पेक्षा जास्त गुण मिळवले.

गुरुकुल विभागातील गंधार नाईक हा युनायटेड प्रशालेतून परीक्षेसाठी प्रविष्ट झालेल्या २४७ विद्यार्थ्यांमधून संस्कृत आणि गणित या दोन्ही विषयात शंभर पैकी शंभर गुण मिळवणारा एकमेव विद्यार्थी ठरला. तर श्रीश मिलिंद तांबे या विद्यार्थ्याने मराठी विषयात सर्वाधिक ९७ गुण मिळवून संपूर्ण युनायटेड मध्ये २४७ विद्यार्थ्यांमध्ये प्रथम क्रमांक मिळवला.

गुरुकुल मधील शिवम श्रीकृष्ण चव्हाण ७५.२०, मेघ श्रीराम देवळेकर ८३.८०,सोहम नामदेव डोंगरे ८१.००, ओजस सतीश कुंटे ८९.८०, वेद=ह्व रुपेश पवार ८८.२०, सत्यम उत्तम सपकाळ८६.२०,पार्थ सुनील सावर्डेकर ७६.२०, मुग्धा अरुण जोशी ७८.००, सोनाली संतोष कदम ८२.००,श्रेया केशव खाडे ७७.००, भक्ती दत्ताराम लाड ८७.४०, सहिस्ता सचिन पवार ८६.२०,मैत्रेयी पराग पुरोहित ८६.२० या विद्यार्थ्यांनी विशेष गुणवत्ता मिळवली

तर शर्विल श्रीकृष्ण चव्हाण (७३.७०),अक्षय दर्शन परब (७३.४०) आणि ईशान संदीप शिगवण (७४.६०) हे विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले आणि विघ्नेश प्रशांत पवार हा विद्यार्थी ४७.६०% गुण मिळवून उत्तीर्ण झाला.


२४ विद्यार्थ्यांपैकी वीस विद्यार्थी विशेष गुणवत्तेसह म्हणजे ७५ टक्क्यांहून जास्त गुण मिळवून उत्तीर्ण झाले तर तीन विद्यार्थ्यांनी प्रथम श्रेणी आणि एका विद्यार्थ्याने उत्तीर्ण श्रेणी प्राप्त करत यश मिळवले. व्यक्तीपरिचय, मुलाखती, मातृभूमी परीक्षा शिबिरे, वर्षभर साजरे होणारे सांस्कृतिक कार्यक्रम, वक्तृत्व स्पर्धा संगणक, स्पर्धा विज्ञान, संबंधित स्पर्धा आणि अनेक वेगवेगळ्या उपक्रमांमधून मनापासून हिरीरीने सहभागी होत गुरुकुलातील शिकलेल्या अनेक कौशल्यांचा उपयोग करून घेत स्वतःचा अभ्यास स्वतः करत गुरुकुलातील अध्ययन अध्यापन पद्धती, स्वयं अध्ययन आणि जास्तीचे सराव यामुळे हे विद्यार्थी कोणत्याही खाजगी शिकवणीचा आधार न घेता हे यश मिळवू शकले हे गुरुकुल चे वेगळेपण आणि विशेष! /या सर्व विद्यार्थ्यांच्या सुयशा बद्दल सौ. सारिका भावे (शाळा समिती अध्यक्ष गुरुकुल विभाग), सर्व पदाधिकारी परशुराम एज्युकेशन सोसायटी, युनायटेड इंग्लिश स्कूल चिपळूण, गुरुकुल विभाग आणि पालक यांच्याकडून अभिनंदन करण्यात आले.

# दहिवलीत वयोवृद्ध व्यक्तींचे घर हडपण्याचा प्रयत्न प्रशासनाकडे तक्रार

**कर्जत (प्रतिनिधी)**

कर्जत नगरपरिषद हद्दीतील दहिवली येथील कोकणआळी येथील रहिवासी नंदू अनंत रामाणे यांचे वडीलोपर्जित राहते जुने घर आहे.मात्र या जुन्या घरांची पडझड झालेली असून पुर्णपणे मोडकळीस आलेले आहे घराचे छप्पर नादुरुस्त झाल्याने पावसाळ्यात घर कोसळून जीवीतास धोका निर्माण होऊ शकतो त्यामुळे घराची डागडुजी करणेसाठी वयोवृद्ध नंदू अनंत रामाणे यांची एकुलती एक मुलगी वृषाली शिंदे हिने तातडीने कर्जत नगरपरिषदेत एक परवानगी अर्ज दाखल करून परवानगी घेतली होती.सदर घराला एकूण एकूण चार खोल्या असून एका मोठ्या खोलीला पार्टिशन टाकून एक लहान खोलीत राहतात तर उर्वरित तीन खोल्यांमध्ये नंदू रामाणे यांचे भाऊ कै.सुरेश अनंता रामाणे यांचा मोठा परिवारच राहत आहे

सदरचे घर नंदू रामाणे यांची आई कै.सुभद्रा अनंत रामाणे हिच्या नावे असुन घराची कोणतीही





वाटणी किंवा वारसांची नोंद आजपर्यंत झालेली नाही त्यामुळे दहिवली कोकण आळीतील नंदु रामाणे यांनी राहत असलेल्या घर जुना मालमत्ता क्र २८१/०१ नवीन मालमत्ता क्र न२०००३०० व जुना मालमत्ता क्र.२८१/०२ नवीन मालमत्ता क्र.न२०००२९९ या मालमत्ते मध्ये कुठल्याही प्रकारचे बांधकाम करण्यास परवानगी देण्यात येऊ नये अशा स्वरूपाचे पत्र कर्जत नगरपरिषदेला दिनांक २९/०७/२०२४ रोजी देण्यात आले आहे.मात्र नंदू रामाणे यांचे भाऊ कै सुरेश अनंत रामाणे यांची पत्नी सुवर्णा सुरेश रामाने,रितीका राकेश रामाणे, रुपेश सुरेश रामाने,मनिषा रमेश अहिरराव, वैशाली रत्नाकर जाधव , माधुरी शेखर म्हापार्ले, सोनाली संतोष व्यापारी असे मुलगा, मुली आणि जावई एकत्र कुटुंबात राहतात. ते सर्व मिळून त्याचे घरावर कब्जा करण्याच्या उद्देशाने त्रास देत आहे.तसेच घराच्या मोडकळीस आलेल्या घराची दुरुस्ती करणेसाठी गेले असताना कामाच्या ठिकाणी अडथळा निर्माण करून त्यांना व त्यांची मुलगी वृषाली हिला शिवीगाळ दमदाटी करून भांडणे करतात त्यामुळे त्यांच्या जीवीतास धोका निर्माण झाला आहे.याबाबत त्यानी कर्जत पोलिस ठाणे व कर्जत नगरपरिषद यांच्याकडे लेखी तक्रारी अर्ज दाखल केलेले आहे तरी प्रशासनाने आम्हाला लवकरात लवकर योग्य न्याय मिळवून द्यावा अशी मागणी केली आहे.

# सरकारच्या महिला सुरक्षा अजेंड्याची पनवेलमध्ये प्रभावी अंमलबजावणी-सभापती सौ.ममता प्रितम म्हात्रे

## 'महिला व बाल सुरक्षेसाठी विविध प्रतिबंधात्मक उपाययोजना सुचविल्या'



**पनवेल । प्रतिनिधी**

राज्यामध्ये महिला सुरक्षा, महिला सन्मान आणि बाल संरक्षणाला प्राधान्य देणाऱ्या महायुती सरकारच्या धोरणानुसार पनवेलमध्येही महिला व बाल सुरक्षेचा अजेंडा अधिक प्रभावीपणे राबविण्यासाठी महिला व बालकल्याण समितीच्या सभापती सौ. ममता प्रितम म्हात्रे यांनी पुढाकार घेतला आहे. त्याच अनुषंगाने आज कामोठे पोलीस ठाण्यास भेट देत वरिष्ठ पोलीस निरीक्षकांना महिला व बाल सुरक्षेबाबत विविध सकारात्मक आणि प्रतिबंधात्मक उपाययोजनांचे सविस्तर निवेदन सादर करण्यात आले.राज्यामध्ये महिलांच्या सुरक्षेसाठी राबविण्यात येणारे विविध उपक्रम, जनजागृती मोहीम, महिला हेल्पलाईन, पॉक्सो कायद्यांतर्गत कठोर कारवाई आणि शालेय स्तरावरील सुरक्षा शिक्षण याला अधिक बळ देण्यासाठी स्थानिक पातळीवर समन्वयातून काम करण्याची आवश्यकता असल्याचे सौ. ममता प्रितम म्हात्रे यांनी यावेळी नमूद केले.विशेष म्हणजे Good Touch - Bad Touch या शालेय जनजागृती उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण होत असून अशा उपक्रमांचे सकारात्मक परिणाम समाजामध्ये दिसून येत आहेत. मुलांना लहान वयातच सुरक्षिततेबाबत योग्य मार्गदर्शन मिळणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

निवेदनामध्ये निवासी संकुल, सोसायट्या, मॉल, व्यावसायिक संकुले व सार्वजनिक ठिकाणी कार्यरत सुरक्षा रक्षकांची नियमित पोलीस पडताळणी करण्याबाबत सूचना करण्यात आल्या. महिलांच्या सुरक्षेच्या दृष्टीने संवेदनशील ठिकाणी काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची योग्य तपासणी झाल्यास नागरिकांमध्ये अधिक विश्वासाचे वातावरण निर्माण होईल, असे त्यांनी सांगितले.सोसायटी कर्मचारी, हाऊसकीपिंग कर्मचारी, ड्रायव्हर, केअरटेकर व सुरक्षा रक्षकांसाठी महिला व बाल सुरक्षा विषयक संवेदनशीलता प्रशिक्षण आयोजित करण्याबाबतही सूचना करण्यात आली. महिलांशी सन्मानपूर्वक व सुरक्षिततेच्या दृष्टीने वागण्याबाबत सामाजिक भान निर्माण होण्यासाठी अशी प्रशिक्षण सत्रे उपयुक्त ठरतील, असे त्यांनी नमूद केले.

शाळा, महाविद्यालये, शिकवणी वर्ग, क्रीडा संकुले व निवासी परिसरांमध्ये Good Touch - Bad Touch, बाल सुरक्षा, सायबर सुरक्षा आणि पॉक्सो कायद्याबाबत नियमित जनजागृती मोहीम राबविण्याची आवश्यकता त्यांनी अधोरेखित केली. विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता वाढल्यास समाज अधिक सजग आणि सुरक्षित होण्यास मदत होईल, असे त्यांनी स्पष्ट केले.सोसायटी परिसरातील उडत यंत्रणा नियमित कार्यरत ठेवणे व त्याची वेळोवेळी तपासणी करणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून सुरक्षित वातावरण निर्माण करणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.महिला व बाल सुरक्षेसंदर्भात हेल्पलाईन, समुपदेशन सेवा आणि तक्रार निवारण यंत्रणा अधिक प्रभावी करण्याबाबतही निवेदनात सूचना करण्यात आल्या.

महिलांना आणि मुलींना आत्मविश्वासाने तक्रार मांडता यावी यासाठी संवेदनशील आणि तत्पर व्यवस्था उभारणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.मोठ्या निवासी संकुलांमध्ये व सार्वजनिक ठिकाणी महिला सुरक्षा रक्षकांची नियुक्ती करण्याबाबतही सूचना करण्यात आली. महिलांना अधिक सुरक्षित आणि विश्वासार्ह वातावरण उपलब्ध करून देण्यासाठी अशा उपाययोजना महत्त्वपूर्ण ठरतील, असे त्यांनी सांगितले.तसेच गृहनिर्माण संस्था, शाळा, सामाजिक संस्था, पोलीस प्रशासन, महिला व बाल विकास विभाग आणि नागरिक यांच्या संयुक्त सहभागातून महिला व बाल सुरक्षेसाठी विशेष जनजागृती आणि समन्वय उपक्रम राबविण्यासाठी महिला व बालकल्याण समितीमार्फत पुढाकार घेण्यात येणार असल्याचेही सौ. ममता प्रितम म्हात्रे यांनी स्पष्ट केले.

यावेळी कामोठे मंडल भाजपा अध्यक्ष तथा नगरसेवक श्री. विकास घरत, महिला व बालकल्याण समिती सदस्य सौ. सरस्वती काथारा, सौ. अस्मिता घरत, सौ. प्रियंका कांडपिळे, सौ. कुसुम पाटील, ॲड. सौ.प्रतिभा भोईर, सौ. योगिता फडके, सौ. हेमलता गोवारी तसेच भाजप नेते श्री. सुरेश खरात उपस्थित होते. महिला व बाल सुरक्षेसंदर्भातील विविध उपाययोजनांबाबत सर्वांनी सकारात्मक चर्चा करत जनजागृती, समन्वय आणि प्रतिबंधात्मक उपाययोजनांच्या माध्यमातून पनवेलमध्ये अधिक सुरक्षित व विश्वासार्ह वातावरण निर्माण करण्याची भूमिका व्यक्त केली.

> महिला सुरक्षा हा केवळ कायद्याचा विषय नसून समाजाच्या संवेदनशीलतेचा विषय आहे. राज्य शासनाच्या महिला सुरक्षा धोरणाला अधिक बळ देत पनवेलमध्ये महिलांसाठी सुरक्षित, सन्मानपूर्ण आणि विश्वासार्ह वातावरण निर्माण करण्यासाठी आम्ही सातत्याने कार्यरत आहोत.-
>
> सौ. ममता प्रितम म्हात्रे
> सभापती, महिला व बालकल्याण समिती पनवेल महानगरपालिका

# महापालिकेच्या प्रशासकीय त्रुटींवर बोट

## सामाजिक कार्यकर्ते कांतीलाल कडू यांनी घेतली अतिरिक्त आयुक्तांची भेट



**पनवेल । प्रतिनिधी**

ठाणा नाका येथील फर्निचर दुकानांचे अतिक्रमण, आ. विक्रांत पाटील यांचा बस थांबा, लोकनेते दि. बा. पाटील यांचे प्रशासकीय भवनाला नाव, प्रभाग समितीच्या सहाय्यक आयुक्तांची बदली तसेच गार्डन, वाहतुक बेटांवर महापालिकेच्या नावाचे फलक लावण्याविषयी सामाजिक कार्यकर्ते कांतीलाल कडू यांनी आज अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे यांची भेट घेऊन ठोस कारवाईची मागणी केली.

प्रशासनाने दिलेल्या पत्रातील काही महत्वाच्या त्रुटी दाखवत कडू यांनी त्या तातडीने दूर करण्याची मागणी केली. यावर पनवेल महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे यांनी तातडीने निर्णय घेणार असल्याचे सांगत आजच तसे पत्र तयार करुन देतो, असे आश्वासित केले.

२०१९ मध्ये एका ठरावाद्वारे नियोजित महापालिका भवनाला नाव देण्याचा राजकीय पूर्वग्रहदुषित ठराव केला आहे. तो रद्द करुन लोकनेते दि. बा. पाटील यांच्या नावाचा नव्याने ठराव पारित करुन घ्यावा, असे कडू यांनी शेटे यांच्यामार्फत सत्ताधारी भाजपा आणि विरोधी पक्षाला दिला आहे.

ठाणा नाका येथे सिमरन मोटर्सच्या बाजूला फर्निचरची बेकायदा दुकाने वाढत चालली आहेत, ती नेस्तनाबूत करावीत, अशीही मागणी लावून धरली.


फेरीवाला समितीची बैठक न बोलवण्याचा प्रशासनाच्या हेकेखोरपणावरही कडू, मंगेश गोवारी आणि धायाशेठ गोवारी यांनी तीव्र नापसंती व्यक्त केली. त्यांची तातडीने बैठक घेण्यात यावी, असे सुचविले आहे.

वादग्रस्त सहाय्यक आयुक्त रुपाली माने यांच्याविरोधात वाढत्या तक्रारी आणि त्यांचे गैरवर्तन लक्षात घेऊन त्यांची पनवेलमधून उचलबांगडी केली होती. मग पुन्हा त्यांना पनवेलला आणून प्रशासनाने कोणता पुरुषार्थ सिद्ध केला आहे? असा प्रश्न उपस्थित करुन त्यांच्या बदलीची मागणी केली. याशिवाय निवेदनातील अनेक विषयांवर सविस्तर चर्चा केली.

त्यानंतर पनवेल तालुका पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक गजानन घाडगे यांची शिष्टमंडळाचसह कडू यांनी भेट घेतली.वाजे गावात झालेल्या मारहाण प्रकरणात यशवंत पाटील यांना नाहक मारझोड केल्याने आरोपींवर अद्याप प्रतिबंधक कारवाई न केल्याने त्याविषयी घाडगे यांच्याशी सविस्तर चर्चा केली. तसेच आरोपींवर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी केली.

यावेळी कडू यांच्या समवेत मंगेश गोवारी, ॲड. मनस्वी गोवारी, धायाशेठ गोवारी, संजोगिता परदेशी, अश्विनी भोसले, सुधीर सोमवंशी, किरण करावकर, सुरेश भोईर, हरेश पाटील, भाऊ फडके आदी जण उपस्थित होते.

# निवळी येथे श्री वाघजाई ग्राम देवता मंदिराचा पहिला वर्धापन दिन उत्साहात साजरा होणार




**संगमेश्वर । सत्यवान विचारे**

संगमेश्वर तालुक्यातील निवळी येथे श्री वाघजाई ग्रामदेवता मंदिराचा पहिला वर्धापन दिन सोहळा मंगळवार दिनांक १४ मे २०२६ रोजी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. यानिमित्त विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.या सोहळ्याची सुरुवात सकाळी धार्मिक विधी, महाअभिषेक आणि पालखी मिरवणुकीने होणार असून, दुपारी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच सायंकाळी महिला मंडळाच्या सहभागातून हळदी-कुंकू कार्यक्रम, हरिपाठ आणि रात्री भजनाचा कार्यक्रम होणार आहे.या कार्यक्रमासाठी परिसरातील भाविक, ग्रामस्थ तसेच महिला मंडळ मोठ्या संख्येने उपस्थित राहणार असून, निवळी गावात भक्तिमय वातावरण निर्माण होणार आहे.या सोहळ्यास सर्व भाविकांनी उपस्थित राहून कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन श्री ग्रामदेवता मंदिर जिर्णोद्धार समिती, ग्रामस्थ व महिला मंडळ निवळी यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# श्रीवर्धन पुणे प्रवासाला साडेआठ तास वातानूकुलीत शिवशाही बस मधील प्रवासी घामाघुम

**श्रीवर्धन । प्रतिनिधी**

श्रीवर्धन आगाराच्या शिवशाही बस बाबतीत वाढत्या तक्रारी असुन आगाराकडून या बाबतीत कोणतीही दखल घेतली जात नाहीये.आगाराचे प्रवासी वर्गाकडे होणारे दुर्लक्ष याचा मनस्ताप श्रीवर्धन पुणे मार्गावरील शिवशाही बसच्या प्रवासी वर्गाला झाला आहे.

रविवार दिनांक १० मे रोजी श्रीवर्धन आगाराची दुपारी दोन वाजता गोरेगाव मार्गे पुणे येथे मार्गस्थ होणार्या शिवशाही बसचा त्रासदायक अनुभव प्रवासी वर्गाने घेतला आहे.बस क्रमांक एम एच ०६ बी डब्ल्यू ३४२९ स्थानकातून मार्गस्थ झाल्यावर अत्यंत धीम्या गतीने प्रवास सुरू असल्याने प्रवासी वर्गाने नाराजी व्यक्त केली.त्यातही बस मधील वातानुकूलित यंत्रणा बंद अवस्थेत , काचा वरील दुर्गंधी युक्त पडदे त्यातच नादुरुस्त व फाटकी पुश बॅक आसने याचा मनस्ताप बस मधील पंचेचाळीस प्रवाशांना सहन करावा लागला.

श्रीवर्धन स्थानकातून दुपारी दोन वाजता पुणे येथे मार्गस्थ होणारी बस साधारणपणे सायंकाळी साडेसात वाजता स्वारगेट येथे दाखल होते.परंतु , सदरची धीम्या गतीने जाणारी शिवशाही बस स्वारगेट येथे रात्री साडेदहा वाजता पोहोचल्याने प्रवासी वर्गाने नाराजी व्यक्त केली.




### परिवहन मंत्री प्रताप सरनाईक उर्मट आणि उद्धट कर्मचाऱ्यांकडे लक्ष देतील का?

**प्रवासी वर्गाने कंट्रोल रूम येथे फोन केला असता , ज्या आगाराची बस आहे तिथे तक्रार दाखल करा.आम्हाला फोन करू नका असे उत्तर दिले.प्रवाशांनी स्थानकात फोन केल्यावर आम्ही याच बसने प्रवास करतो , या बसचा आम्हाला कधी त्रास जाणवला नाही.तुम्हाला कसा त्रास होतोय.असे उत्तर दिले गेले.त्यानंतर प्रवासी वर्गाचे फोन केले असता फोन रिसिव्ह करण्यात आले नाहीत.**

**या शिवशाही बस मध्ये ज्येष्ठ नागरिक , लहान मुले होती.आम्ही कंट्रोल रूम व स्थानकात फोन केला.उडवाउडवीची उत्तर दिली.नादुरूस्त व धीम्या बसचा आम्हाला त्रास झाला.या मार्गावर साधी बस सुरू करावी.**

**:-जगदीश पाडलेकर.प्रवासी.बागमांडला.**




**ठाणे : राष्ट्रवादी काँग्रेस-शरदचंद्र पवार पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस आमदार डॉ.जितेंद्र आव्हाड आणि प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांच्या हस्ते ठाणे महानगर पालिकेतील पक्षाचा गटनेते अभिजीत पवार यांच्या कार्यालयाचे अनावरण करण्यात आले. यावेळी जिल्हाध्यक्ष मनोज प्रधान, विरोधी पक्ष नेते शानू पठाण, ठाणे शहर महिला अध्यक्ष मनिषाताई भगत यांच्यासह नगरसेवक , पदाधिकारी उपस्थित होते. ( फोटो - संतोष पडवळ )**

# कर्जतकरांचा महावितरण कार्यालयावर घेराव; वारंवार खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्याबाबत तीव्र संताप



**कर्जत । जयेश जाधव**

वाढत्या उकाड्यात वारंवार खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्यामुळे त्रस्त झालेल्या नागरिकांनी सोमवारी ता.११ रोजी कर्जत येथील महावितरण कार्यालयावर घेराव घालत तीव्र नाराजी व्यक्त केली. कर्जत तालुका वीज ग्राहक संघर्ष समितीच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनात मोठ्या संख्येने नागरिक सहभागी झाले होते.

महावितरणचे उपकार्यकारी अभियंता चंद्रकांत केंद्रे यांनी कार्यालयाबाहेर येऊन नागरिकांशी चर्चा केली. यावेळी ड. कैलास मोरे, रंजन दातार यांच्यासह अनेक नागरिकांनी सतत वीज जाणे, वारंवार शटडाऊन, चुकीची मीटर रीडिंग, वाढीव वीजबिले आणि कर्मचाऱ्यांकडून होणारी अरेरावी याबाबत जाब विचारला. वीजपुरवठा खंडित झाल्यास नागरिकांना तात्काळ माहिती मिळावी यासाठी स्वतंत्र संपर्क क्रमांक आणि माहिती केंद्र सुरू करण्याची मागणीही करण्यात आली.

संघर्ष समितीने दिलेल्या निवेदनात तालुक्यातील जीर्ण तारा, पोल आणि धोकादायक उपकरणे तातडीने बदलण्याची तसेच वाढीव भार लक्षात घेऊन नवीन इनकमर व सबस्टेशन उभारण्याची मागणी केली आहे. ऑगस्ट २०२४ मध्ये याच मागण्यांसाठी आठ दिवस साखळी उपोषण करण्यात आले होते.

उपअभियंता केंद्रे यांनी सांगितले की, कर्जतमधील वाढत्या वीजभारासाठी काही तांत्रिक प्रस्ताव वरिष्ठांकडे पाठविण्यात आले असून आवश्यक बदल लवकरच सुरू होतील. पुढील काही दिवसांत परिस्थितीत सुधारणा दिसून येईल, अशी ग्वाही त्यांनी दिली.दरम्यान, कर्जत तालुक्यातील सुमारे एक लाख ग्राहकांच्या तुलनेत विद्यमान यंत्रणा अपुरी पडत असल्याने वीजपुरवठ्याच्या समस्या वाढत आहेत. त्यामुळे महावितरणने तातडीने ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

# पुणे जिल्ह्यात गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान सोहळा १७ मे रोजी इंदापूरमध्ये

**इंदापूर । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य एकनाथ स्वाभिमानी शिक्षक सेना, पुणे जिल्हा यांच्या वतीने एस.एस.सी. व एच.एस.सी. परीक्षेत यश मिळवलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला आहे. हा कार्यक्रम रविवार, १७ मे २०२६ रोजी सकाळी १० वाजता इंदापूर येथील गुरुकृपा सांस्कृतिक भवन, राहुल सिनेमा जवळ पार पडणार आहे.पुणे जिल्ह्यातील माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधून इयत्ता दहावी व बारावी बोर्ड परीक्षेत प्रथम तीन क्रमांक मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा तसेच संबंधित शाळांचा सन्मान या कार्यक्रमात करण्यात येणार आहे.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विभागीय शिक्षण उपसंचालक पुणे डॉ. गणपतराव मोरे हे असणार आहेत. प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणेचे अध्यक्ष औदुंबर उकिरडे, परीक्षा परिषद पुणेचे उपायुक्त मारुती फडके तसेच एकनाथ स्वाभिमानी शिक्षक सेनेचे प्रदेशाध्यक्ष डॉ. बापूसाहेब अडसूळ उपस्थित राहणार आहेत. याशिवाय सोलापूर जिल्हा एकनाथ स्वाभिमानी शिक्षक संघटनेचे अध्यक्ष शेटे सर यांचीही उपस्थिती राहणार आहे.

इंदापूर तालुक्यातील सर्व माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयांच्या मुख्याध्यापक व प्राचार्यांनी आपल्या शाळेतील मार्च २०२५/२६ परीक्षेत प्रथम तीन क्रमांक मिळवलेल्या विद्यार्थ्यांची संपूर्ण माहिती आयोजकांकडे पाठवावी, असे आवाहन करण्यात आले आहे.कार्यक्रमाच्या वेळेबाबतची सविस्तर माहिती व्हॉट्सअॅप ग्रुपद्वारे किंवा वैयक्तिकरित्या देण्यात येणार असून, अधिक माहितीसाठी दत्तात्रय गवळी (९६८९१२४३०२), प्रवीण लोंढे (९९२२५९६६७२).

दैनिक लोकांकीत हे वृत्तपत्र मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक संजय त्रिंबक पवार यांनी पार्थ प्रिंटींग प्रेस, कर्नाळा भवन, ४५/६१, सहकारी भात गिरणी कंपाऊंड मार्केट यार्ड, पनवेल, जि. रायगड पिन ४१०२०६ येथे छापून मुख्य कार्यालय,शॉप नं.१२४, दत्त मंदिर चाळ, कोंकण नगर, नवजिवन सोसा. समोर, रामकृष्ण चेंबूरकर मार्ग, चेंबूर, मुंबई पिन.७८ पनवेल कार्यालय,साई शरण को-ऑप. ही. सोसायटी, प्लॉट नं. ५०, ऑफिस नं. १४, सेक्टर ८, खांदा कॉलनी, नवीन पनवेल ४१० २०६ येथून प्रकाशित केले. मो. ९३२१५८५३६५